## श्री. धाबेकर कला महाविद्यालयातील प्रा. अमरिष एस. गावंडे यांच्या 'समाजशास्त्र परिचय' पुस्तकाचे प्रकाशन

खडकी, अकोला : स्थानिक श्री. धाबेकर कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख **प्रा. अमरिष एस. गावंडे** यांच्या 'समाजशास्त्र परिचय' पुस्तकाचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगिता लोहकपुरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले या प्रसंगी **मा. सिद्धार्थभाऊ पाटील** प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रा. अमरिष एस. गावंडे यांनी बी.ए. भाग —१(सत्र—१) च्या विद्यार्थ्यांकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमानुसार उपयुक्त 'समाजशास्त्र परिचय' या पुस्तकाचे स्वत: लिखान केले. विद्यार्थ्यांना अध्ययनामध्ये उपयुक्त असणारे 'समाजशास्त्र परिचय' या पुस्तकामध्ये बी.ए. भाग —१ ( सत्र — १) च्या अभ्यासक्रमानुसार महत्वाच्या संकल्पनांचे अतिशय सोप्या व सरळ भाषेत विश्लेषण केले आहे. सामान्य विद्यार्थ्यांना अध्ययन करतांना या पुस्तकाचा चांगल्या प्रकारे लाभ होवू शकतो.

प्रमुख अतिथी मा. सिद्धार्थभाऊ पाटील यांनी 'समाजशास्त्र परिचय' या पुस्तकातील विश्लेषण विद्यार्थ्यांना उपयुक्त असून प्रा. अमरिष गावंडे यांचा प्रयत्न प्रशंसनिय असल्याचे मत व्यक्त केले व त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आपले अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगिता लोहकपुरे समाजशास्त्र परिचय या पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रगती करिता केलेला प्रयत्न अतिशय उपयुक्त असून समाजशास्त्र विषय शिकणाऱ्या विद्यार्थ्याकरिता अतिशय सोप्या भाषेत मांडलेल्या संकल्पना उपयुक्त ठरतील. महाविद्यालयाच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून सुद्धा प्रा. अमरिषस एस. गावंडे यांचा प्रयत्न अभिनंदनास पात्र आहे.

प्रा. अमरिष एस. गावंडे यांनी आपल्या या प्रयत्नास वडील **श्री. श्रीकृष्ण गावंडे** यांच्या चरणी अर्पण केले व आपल्या या कार्याचे श्रेय **सन्मानीय अनिलभाऊ धाबेकर** आणि कुटुंबातील सदस्यांना व सहकार्यांना दिले.

मा. संपादक साहेब,

दै.................................

..................................

आपल्या लोकप्रिय वर्तमान पत्रात हि बातमी प्रसिद्ध करावी हि विनंती.